MHSO100000892019

## नियमीत दिवाणी दावा क्र.१११/२०१९ मधील नि.क्र.१२९ खालील आदेश.

वादींनी सदरचा अर्ज वादातील तालीवरील झाडांच्या फांद्या व मुळया ज्या त्यांच्या शेतात पसरलेल्या आहेत त्या तोडण्यास परवानगी मिळण्यासाठी व त्या कामासाठी न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणुकीसाठी दिलेला आहे. वादींनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की त्यांनी सदरचा दावा हा त्यांची जमीन गट क्र.२६६/१ ते २६६/३ हिच्या हद्दीखुणा कायम होऊन मिळण्यासाठी व कायमच्या मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. गट क्र.२६६ च्या उत्तर बाजूस प्रतिवादींच्या मालकीचा गट क्र.२९३ आहे. गट क्र.२६६ मध्ये उत्तर बाजूस मोठी ताल असून ती वादींच्या मालकीची आहे. सदरचे तालीवर मोठी झाडे असून प्रतिवादींनी हद्दीचा वाद उपस्थित करुन तालीवर ते त्यांचा हक्क सांगू लागले आहेत. सदरचे प्रकरणात कोर्ट कमिशन मोजणी झाली असून त्या मोजणीत वादातील ताल वादींच्या हद्दीत दाखविली आहे. त्या तालीवर मोठी वेडया बाभळीची, चिलारीची झाडे आहेत. सदरच्या झाडांच्या फांद्या व मुळया वादींच्या जमीनीत दक्षिण बाजूस पसरलेल्या आहेत. वादींना आता दावा मिळकतीमध्ये ऊसाचे पिक घ्यायचे आहे. ऊसाच्या लागवडीचा हंगाम संपत आला आहे. प्रतिवादी हे वादींना तालीवरील झाडांच्या फांद्या व मुळया तोडू देत नाहीत. त्यामुळे वादींना

त्यांच्या जमीनीत ऊसाची लागवड करण्यासाठी नांगरट करणे अशक्य झाले आहे. यापुर्वी वादींनी याच दाव्यात न्यायालयीन आयुक्तांमार्फत झाडांच्या फांद्या तोडण्यास न्यायालयाची परवानगी २ वेळेला घेतलेली होती. त्यामुळे सदरच्या तालीवरील झाडांच्या दक्षिण बाजूकडील फांद्या व मुळया तोडण्यासाठी परवानगी मिळण्याची व सदरचे कामासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करण्याची विनंती त्यांनी केली आहे. शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जास प्रतिवादींनी नि.क्र.१३० वर जबाब दिला आहे. सदरच्या जबाबात त्यांनी वादींच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्यांनी पुढे कथन केले आहे की, सदरचे दाव्यातील दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान सदरचा दावा सोडून नि.दि.दा.क्र.११३/२०१९, नि.दि.दा.क्र.११८/२०१९ व नि.दि.दा.क्र.०७/२०२१ असे एकूण ४ दाव्यांचे कामकाज प्रलंबित आहे. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान चालू असलेल्या नि.दि.दा.क्र.११३/२०१९ यामध्ये न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक होवून त्याबाबतचे कमिशनचे कामकाज होऊन त्या दाव्याकामी नि.क्र.३० अन्वये हस्त नकाशासह अहवाल अभिलेखावर आलेला आहे. तसेच प्रतिवादींनी वादी व इतरांविरुध्द दाखल केलेल्या नि.दि.दा.क्र.११३/२०१९ (जुना नि.दि.दा.क्र.८३३/२००६) या दाव्यातील नि.क्र.५ कामी ताल व तालीवरील झाडे तोडू नये व पाण्याचे चेंबर फोडू नये असा तात्पुरता मनाई हुकूम न्यायालयाने दिलेला असून तो आज अखेर कायम आहे.

३. वादींनी यापुर्वी नि.दि.दा.क्र.११८/२०१९ या दाव्यात अशाच

प्रकारे वादातील तालीवरील झाडांच्या फांद्या तोडण्याबाबत अर्ज दिलेला होता व तो मंजूर करण्यात आलेला होता. त्या अर्जाकामी ता.२२.०९.२०११ रोजी झालेल्या आदेशाविरुध्द यातील प्रतिवादींनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.८९१९/२०११ हे दाखल केले होते. त्या पिटीशनची चौकशी होऊन ता.१९.१०.२०११ रोजी त्यात आदेश पारित करण्यात आला आहे की, ता.२२.०९.२०११ चा आदेश कायम करण्यात आला आहे परंतु त्या आदेशातील मुद्दा क्र.७ हा रद्द करण्यात आला आहे. त्याऐवजी, सदरच्या फांद्या तोडल्यानंतर त्या अर्जदारांनी गोळा कराव्यात व त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचा वापर करण्यास त्यांना मुभा आहे, असा आदेश पारित करण्यात आला आहे. सदरच्या आदेशाविरुध्द वादींनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे रिव्हयु पिटीशन दाखल केले होते व ते सुध्दा नामंजूर झाले आहे. आता नि.दि.दा.क्र.११८/२०१९ मध्ये कोर्ट कमिशनचा रिपोर्ट आलेला आहे. तो प्रतिवादींना मान्य व कबूल नसल्याबाबत त्यांनी त्याबाबत म्हणणे दिले आहे. त्यानंतर प्रतिवादींनी फेरमोजणीसाठी अर्ज दिलेला आहे. नि.दि.दा.क्र.०७/२०२१ कामी या प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–७, नियम–११ च्या तरतुदीप्रमाणे दिलेल्या अर्जाकामी झालेल्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दिवाणी फेरतपासणी अर्ज क्र.०३/२०२१ दाखल केला असून त्याचे कामकाज प्रलंबित आहे.

४. सदरचे प्रकरण प्रलंबित असताना पुन्हा पुरावा गोळा करण्यासाठी वादींनी ऊस लागवडीचे अर्जात खोटे कारण सांगून वादातील तालीवरील झाडांच्या दक्षिण बाजूकडील फांद्या व मुळया तोडण्यास न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक होऊन मिळण्यासाठी सदरचा अर्ज

दाखल केला आहे. वादींची सदरची मागणी ही मुळातच बेकायदेशीर व चुकीची आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, वादींच्या मिळकतीत कोणत्याही झाडांच्या फांद्या आलेल्या नाहीत. त्यामुळे झाडांच्या फांद्या व मुळया तोडण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच एखाद्या झाडांच्या मुळया तोडणे म्हणजे एखाद्या दाव्याचा निकाल झाल्यासारखे होणार आहे. सदरच्या झाडांच्या मुळया तोडल्यास त्या झाडास मुळयाचाच आधार असल्यामुळे ती झाडे उखडून पडण्याची शक्यता आहे. न्यायालयाकडून पुरावा गोळा करण्यासाठी वादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. म्हणून शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती केली आहे.

५. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्यांवर मी माझे कारणांसह खालील निष्कर्ष नोंदवीत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादातील तालीवरील झाडांच्या दक्षिणेकडील बाजूंच्या फांद्या व मुळया तोडण्यास वादींना परवानगी देणे आवश्यक आहे काय? | ... | ...अशंतः होय. फक्त फांद्या तोडण्याबाबत. |
| २. | न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | आदेश काय? | ... | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबतः–**

६. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.वाघमोडे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. वादींचे विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, वादातील ताल ही वादींच्या हद्दीत असल्याचा निमताना मोजणीचा अहवाल आलेला आहे. वादातील तालीवर दक्षिण बाजूने म्हणजेच वादींच्या मालकीच्या गट क्र.२६६ च्या उत्तर बाजूने तालीवरील मोठी बाभळीची व चिलारीची झाडे असून त्या झाडांच्या फांद्या व मुळया वादींच्या जमीनीत दक्षिण बाजूस पसरलेल्या आहेत. सदरच्या झाडांच्या फांद्या वादींच्या शेतात १०० फुटांपर्यंत आलेल्या आहेत. त्यामुळे वादींना त्यांच्या शेतात ऊसाची लागवड करण्यास अडथळा होत आहे. प्रतिवादी हे वादींच्या शेतात आलेल्या सदरच्या झाडांच्या फांद्या तोडू देत नाहीत. यापुर्वीही वादींच्या शेतात येणा–या झाडांच्या फांद्या न्यायालयीन आयुक्तांमार्फत तोडण्याचा आदेश न्यायालयाने केला होता. आता पुन्हा सदरच्या तालीवरील झाडांच्या फांद्या वादींच्या शेतात आल्यामुळे वादींना त्यांच्या शेताची मशागत करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे सदरच्या झाडांच्या फांद्या व मुळया तोडण्यास परवानगी देण्याची व ते काम न्यायालयीन आयुक्तांच्या उपस्थितीत करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करण्याची विनंती त्यांनी केली आहे. म्हणून शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. याउलट, प्रतिवादींचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, नि.दि.दा.क्र.११३/२०१९ यामध्ये नि.क्र.५ वर न्यायालयाने सदरच्या तालीवरील झाडे तोडू नयेत व पाण्याचे चेंबर फोडू नये असा तात्पुरता मनाई हुकूम दिलेला असून तो आजही कायम आहे. त्यामुळे सदरची झाडे तोडण्यास परवानगी देता येणार नाही. तसेच सदरच्या झाडांच्या मुळया तोडण्यास परवानगी दिली तर, सदरची झाडे उखडून निघतील. त्यामुळे सदरच्या झाडांच्या मुळया तोडण्यास परवानगी देता येणार नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, नि.दि.दा.क्र.११८/२०१९ यात कोर्ट कमिशनचा अहवाल आलेला असून तो प्रतिवादींना मान्य व कबूल नसल्यामुळे त्यांनी फेरमोजणीसाठी अर्ज दिलेला आहे. वादींच्या मिळकतीत सदरच्या तालीवरील कोणत्याही झाडांच्या फांद्या आलेल्या नाहीत. त्यामुळे सदरच्या झाडांच्या फांद्या किंवा मुळया तोडण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. म्हणून शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

८. मी सदरचे दाव्यातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. नि.दि.दा.क्र.११३/२०१९ यामध्ये नि.क्र.५८ वरील आदेशामध्ये न्यायालयाने वादी व प्रतिवादी यांनी आहे ती परिस्थीती कायम ठेवावी व प्रतिवादींनी ताल सोडून वादींच्या इतर दावा मिळकतीत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत स्वतः अगर अन्य इसमांमार्फत हरकत अडथळा करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूम दिलेला आहे. नि.दि.दा.क्र.११८/२०१९ (जुना नि.दि.दा.क्र.७८२/२००६) हा सुध्दा या दाव्यातील वादींनी या दाव्यातील प्रतिवादींविरुध्द कायमचे मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. नि.दि.दा.क्र.११८/२०१९ यामध्ये नि.क्र.३१ वर वादींनी सदरच्या तालीवरील ज्या झाडांच्या फांद्या वादींच्या शेतात येत होत्या, त्या

तोडण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी ता.२२.०९.२०११ रोजी मंजूर केला आहे. सदरचा आदेश प्रतिवादींनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.८९१९/२०११ अन्वये आव्हानित केला होता. मा.उच्च न्यायालयाने सदरचा ता.२२.०९.२०११ चा आदेश कायम केला, परंतु सदरच्या झाडांच्या फांद्या तोडल्यानंतर त्या प्रतिवादींना देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा सदरचे दाव्यात म्हणजेच नि.दि.दा.क्र.१११/२०१९ (जुना नि.दि.दा.क्र.७८०/२००६) यामध्ये वादींनी नि.क्र.६९ वर वादातील तालीवरील झाडांच्या वादींच्या जमीनीवरील लोंबकळणा–या फांद्या तोडण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी ता.२८.०४.२०१६ रोजी मंजूर केलेला आहे. त्यानंतर न्यायालयीन आयुक्तांमार्फत वादींच्या जमीनीवरील झाडांच्या फांद्या तोडण्यात आल्या असून त्याबाबत न्यायालयीन आयुक्तांनी त्यांचा अहवाल दाखल केला आहे.

९. मी वर नमुद केल्याप्रमाणे, आजपावेतो दोन वेळेला वादातील तालीवरील झाडांच्या फांद्या ज्या वादींच्या जमीनीत येत होत्या व त्यामुळे वादींच्या शेतीमध्ये मशागत करण्यास अडचण येत होती त्या फांद्या तोडण्याबाबत माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आदेश पारित केले आहेत. आता सुध्दा पुन्हा सदरच्या वादातील तालीवरील झाडांच्या फांद्या वादींच्या शेतात आल्याचे वादींनी सदरच्या अर्जात कथन केले आहे. मी नि.क्र.१३८/२ वर असलेले फोटोग्राफ्स पाहिले. त्यावरुन प्रथमदर्शनी दिसून येते की, वादातील तालीवरील झाडांच्या फांद्या वादींच्या शेतात झुकलेल्या आहेत व त्यामुळे त्या भागाची मशागत वादींना करता येत नाही.

सदरच्या झाडांच्या फांद्या वादींच्या शेतात आल्यामुळे सदरचे क्षेत्र पडीक राहत असल्याचे दिसून येते. कोर्ट कमिशन निमताना/तातडी/मो.र.क्र.१४४६ च्या नकाशावरुनही दिसून येत आहे की, सदरची वादातील ताल ही वादींच्या हद्दीत आहे. तसेच वादींचे गट क्र.२६५ पैकीचे १.५० आर. क्षेत्र प्रतिवादींच्या गट क्र.२९३ च्या वहिवाटीत आहे. तसेच वादींचे गट क्र.२६६ पैकी ३.५० आर. क्षेत्र प्रतिवादींच्या गट क्र.२९३ च्या वहिवाटीत आहे. वर नमुद केल्याप्रमाणे, वादातील तालीवर असणा–या झाडांच्या फांद्या दक्षिण बाजूने वादींच्या शेतात पसरलेल्या आहेत. त्यामुळे सदरच्या फांद्याच्या खालचा भाग पडीक राहत असून वादींना त्याची मशागत करता येत नाही. त्यामुळे सदरच्या फांद्या तोडण्यास वादींना परवानगी देणे आवश्यक आहे.

१०. वादींनी त्यांच्या अर्जात विनंती केली आहे की, सदरच्या तालीवरील झाडांच्या मुळया ज्या वादींच्या शेतात पसरलेल्या आहेत, त्या सुध्दा तोडण्यास परवानगी देण्यात यावी. परंतु सदरच्या झाडांच्या मुळया तोडल्या तर ती झाडे उखडून पडतील. त्यामुळे सदरच्या झाडांच्या मुळया तोडण्यास परवानगी देता येणार नाही. सदरच्या झाडांच्या फांद्या ज्या वादींच्या शेतात पसरलेल्या आहेत, त्या न्यायालयीन आयुक्तांच्या उपस्थितीत तोडणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या फांद्या तोडल्यानंतर त्या न्यायालयीन आयुक्तांनी विक्री करुन आलेली रक्कम न्यायालयात जमा करणे आवश्यक आहे. सदरचे दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी सदरची रक्कम कोणाला द्यायची, याबाबत ठरविण्यात येईल. त्यामुळे मी वर नमुद केल्याप्रमाणे, वादींचा अर्ज अंशतः मंजूर करुन न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे हे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'अंशतः

होकारार्थी' व मुद्दा क्र.२ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवीत आहे. त्यामुळे मुद्दा क्र.३ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादींचा नि.१२९ चा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्त म्हणून ॲड.श्री.पी.ए.गुजर यांची नेमणूक करण्यात येत आहे.

३. वादींनी वादातील तालीवरील ज्या झाडांच्या फांद्या त्यांच्या जमीनीत दक्षिण बाजूस पसरलेल्या व लोंबकळलेल्या आहेत, त्या न्यायालयीन आयुक्त यांच्या उपस्थितीत तोडण्यात याव्यात.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी सदरच्या तोडलेल्या फांद्याचे लाकूड हे विक्री करावे व आलेली रक्कम न्यायालयात जमा करावी.

५. वादींनी न्यायालयीन आयुक्तांची फी रु.७,०००/- ही ता.२०.०१.२०२६ रोजी किंवा त्या पूर्वी न्यायालयात जमा करावी.

६. सदरची वर नमूद केलेली रक्कम न्यायालयात जमा केल्यानंतर न्यायालयीन आयुक्तांना त्यांच्या नियुक्तीबाबतचे पत्र देण्यात यावे. त्यानंतर न्यायालयीन आयुक्तांनी दोन्ही पक्षांना नोटीसा काढाव्यात.

७. वादी व प्रतिवादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत त्यांना आयुक्तांच्या नोटीसा मिळाल्यानंतर त्यात नमूद केलेल्या दिवशी व वेळेला सदरच्या स्थळावर हजर रहावे. न्यायालयीन आयुक्तांना नि.क्र.१, १२९ व नि.क्र.१२९ वरील आदेशाची प्रत अवलोकनासाठी देण्यात यावी.

**<u>नि.दि.दा.क्र.१११/२०१९,</u>**
**<u>नि.क्र.१२९ खालील आदेश</u>.**

८. न्यायालयीन आयुक्तांनी त्यांचा अहवाल सदरचे न्यायालयात ता.०२.०३.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावा.

९. वादींची सदरच्या अर्जातील वादातील तालीवरील झाडांच्या मुळया तोडण्याबाबतची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.01.12 17:21:03 +0530

(सोपान द.घनवट)

दि.१२.०१.२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

**नि.दि.दा.क्र.१११/२०१९,**
**नि.क्र.१२९ खालील आदेश.**

शेरा

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.१२.०१.२०२६.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.१२.०१.२०२६.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.१२.०१.२०२६.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.१२.०१.२०२६.

स्वाक्षरीत/–

(श्री. म. पां. सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस